# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ११ // विशेष स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक २६/०६/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.२६/०६/२०१९ बुधवार रोजी दुपारी ४.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती श्री.जितेंद्र भगवानराव मराठे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. श्री.जितेंद्र भगवानराव मराठे, सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| बालाणी भगतराम रावलमल | सनकत चेतन गणेश |
| ढेकळे सदाशिव गणपत | कापसे मयुर चंद्रकांत |
| बेंडाळे उज्वला मोहन | पाटील प्रतिभा सुधिर |
| अड.हाडा शुचिता अतुलसिंह | लढ्ढा नितीन बालमुकूंद |
| सोनवणे सुरेश माणिक | भंगाळे विष्णू रामदास |
| पोकळे दिलिप बबनराव | बरडे नितीन मनोहर |
| खडके सुनिल वामनराव | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| कोल्हे प्रविण रामदास | |

सदर सभेस, मा.आयुक्त,डॉ.श्री.उदय टेकाळे मा.उपायुक्त,श्री.चंद्रकांत खोसे, श्री.लक्ष्मीकांत कहार, मुख्य लेखापरिक्षक, श्री. संतोष वाहुळे, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली.**

मा.सभापती :- नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करावी.

**नगरसचिव :- सभेला सुरुवात करणेत येत आहे.**

**नगरसचिव:- विषय क्र. १) केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजने अंतर्गत जळगांव शहराच्या मलनिस्सारण योजना टप्पा – ०१ साठी ई-निविदा क्रं.१२८१ मध्ये प्राप्त झालेल्या निविदा दरास मान्यता मिळणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.**

श्री.सदाशिव ढेकळे :- प्रशासनाने सुस्पष्ट अभिप्राय दिलेला नाही. मा.आयुक्त साहेबांनी दिलेला नाही तसेच मुख्यलेख्य लेखापरिक्षक यांनी सुध्दा स्पष्ट अभिप्राय दिलेला नाही. असे का स्पष्ट अभिप्राय दिला पाहीजे की, देण्यास हरकत नाही असे डॉकेटमध्ये प्रशासनाने सुस्पष्ट अभिप्राय दिला पाहीजे. काय मत आहे ?

म.आयुक्त :- म्हणजे कुठल्या कुठल्या मुदयांवर स्पष्ट अभिप्राय दयायला पाहीजे होते ,सन्मा.सदस्यांपैकी अजुन कोणाला काही बोलायचे असेल तर बोलावे सर्वांचे मत ऐकल्यानंतर मी यावर खुलासा करेल.

श्री.नितीन लढ्ढा :- मा.सभापती महोदय, सन्मा.सदस्य ढेकळे साहेब यांनी जो मुद्दा मांडला तो योग्य आहे. की सदर प्रस्ताव या सभागृहापुढे मांडण्यापुर्वी जी प्रस्तावाची पार्श्वभुमि आलेली आहे परंतू प्रस्तावाच्या पार्श्वभुमीच्या अनुषगांने खातेप्रमुखांनी फक्त विवरण जे आहे ते प्रस्तावामध्ये दिलेले आहे . यासंदर्भात निर्णय घेणे कायदेशीर रित्या संयुक्तीक होईल किंवा होणार नाही हा अभिप्राय मुख्यलेखापरिक्षक तदनंतर मा.आयुक्त साहेब यांचे अभिप्राय असणे आवश्यक व अपेक्षितही होते. या संपुर्ण प्रकरणाचा ज्यावेळेला या प्रस्तावाचा अभ्यास केला या अभ्यासाअंती आपली भुमिका जी आहे भुमिका आहे, की सदरहु मक्तेदार कृष्णा ईन्फ्रास्ट्रक्चर यांचे काम रद्द करणे हे कितपत संयुक्तीक आहे आणि योग्य आहे आणि त्या कंपनीचे ओव्हरऑल रेप्युटेशन ज्या करीता चर्चा करून विविध ठिकाणची माहिती घेवुन या निर्णयाप्रत आला आहांत ती भुमिका योग्य आहे परंतू या भुमिकेच पुढे समर्थन कशा पध्दतीने करावे ? या संदर्भातील बऱ्याचश्या ज्या गोष्टी आहेत त्या संदिग्ध वाटतात कारण आणि त्या संदिग्ध वाटणे मुळात की या संपुर्ण भुयारी गटार योजना किंवा आपली अमृतची पाणी पुरवठा योजना या दोन्ही योजनां करीता आपण कंन्सलटंसी एजंन्सी म्हणुन एम.जी.पी .ला प्राधिकृत केलेले आहे जेंव्हा एखादी बी.एम.सी आपण प्रधिकृत करतो त्यावेळेला महानगरपालिकेची जी अपेक्षा असते की जे दायित्व बी.एम.सी वर आहे ते दायीत्व बी.एम.सी.ने योग्य रितीने पार पाडायला पाहीजे परंतू या प्रस्तावावर अभ्यास करतांना असे दिसुन येत आहे की, बी.एम.सी.म्हणुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी अत्यंत बेजबाबदार पणे आणि अकार्यक्षम पध्दतीने संपुर्ण प्रकरणाचा निवाडा दिलेला आहे आणि त्या निवाळयाच्या अनुषंगांने आज या सभागृहामध्ये या प्रस्तावावर या अशा पध्दतीने निर्णय घेण्यासंदर्भातील भुमिका या सभागृहासमोर आलेली आहे ,

यापुर्वी सुध्दा एम.जी.पी च्या पार्श्वभुमीच्या अनुषगांने ज्यावेळेला अमृत योजना व पाणी पुरवठा योजना ही साधारणत: दि.१५/०९/२०१६ रोजी अमृत योजना ची निविदा प्रसिध्द झाली होती परंतू त्यावेळेला सुध्दा एम.जी.पी. ने आपली भूमिका ज्या पध्दतीने वठवायला पाहीजे होती त्या पध्दतीने वठविली गेली नसल्या कारणाने हे संपुर्ण प्रकरण निविदा प्रक्रीया छाननी झाली. निविदा प्रक्रीया लिफाफा एक, लिफाफा दोन, एल-1 व एल-2 या या सगळया गोष्टींचा उहापोह झाल्यानंतर हे प्रकरण उच्च न्यायालयात गेले. आणि उच्च न्यायालयामध्ये गेल्यानंतर दि.०४/११/२०१६ रोजी पहीला लिफाफा उघडला होता ही निविदा प्रक्रीया जवळपास पुर्णत्वाच्या मार्गावर होती, अशा परिस्थितीमध्ये एम.जी.पी ने चुकीच्या मक्तेदाराला कॉलबॅक केल्यामुळे सदरहु प्रकरणी दुसरा मक्तेदार हा उच्च न्यायालयामध्ये गेला. उच्च न्यायालयामध्ये गेल्यानंतर तब्बल या निर्णयामुळे कोर्टात ११ महिन्याचा कालावधी या मध्ये गेला, साधारणत: नोव्हेंबर २०१६ मध्ये अंतीम होणारी प्रक्रीया ही ०६/१०/२०१७ म्हणजे तब्बल ११ महिने या एम.जी.पी च्या चुकीच्या निर्णयामुळे प्रलंबित झाली. या ११ महिने प्रलंबीत झाल्यामुळे हे पाणी पुरवठा काम उशिराने सुरु झाले यामध्ये आपण किंवा केंद्राने व शासनानेही यासंदर्भात काही रस घेतला नाही आणि ही निविदा प्रक्रीया भुयारी गटारी योजनेची त्यामध्ये सुध्दा पुन्हा त्याच चुका महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांनी केल्या. कारण मजिप्रा ची ती जबाबदारी आहे की, त्यांनी अटी शर्ती तयार केल्या निविदा तयार केल्या निविदा पुर्ण करणेसाठी महानगरपालिकेकडे सुपुर्द करावे पुनश्च आलेल्या सगळया निविदांच्या ज्या काही आलेल्या होत्या त्यांची काळजी घेणे बी.एम.सी.ने काळजी घेणे गरजेचे होते परंतु या गोष्टींचा अध्ययन करतांना याचा संपुर्ण कुठेतरी म.जि.प्रा ने गांभीर्याने विचार केल्याचे दिसुन येत नाही. एम.जी.पी.कडुन आपण फुकटात अपेक्षा करीत नाही यासदर्भात आपण बी.एम.सी ला ३% म्हणजे साधारण ६९ कोटी रुपयांच्या प्रती मोबदला आपण जवळपास ५ कोटी रुपये देतोय मोबदला दिल्यावर सुध्दा आपल्याला ज्या काही अपेक्षा अपेक्षित आहेत की योग्य मक्तेदार कोण आहे ही या संदर्भातील वस्तुस्थिती या महानगरपालिकेला अवगत करायला पाहीजे जेणेकरून या मनपाला कोठेही किंतु परंतु किंवा कायदेशीर रित्या अडचण / शंका उपस्थित होता कामा नये. ही संपुर्ण वस्तुस्थिती असतांना सुध्दा महाराष्ट्र जिवन प्राधीकरणने आज आपण या प्रस्तावाच्या अनुषगांने मनपाच्या विधि सल्लागारांचे जे मत आहे ते मत या वेळेला प्रस्तावामध्ये दिलेले आहे.

सदर कामी मक्तेदाराच्या विरूध्द मे.न्यायालयात प्रलंबीत असलेल्या दाव्याच्या अनुषंगाने महानगरपालिका विधी सल्लागार यांचे अभिप्रायासाठी प्रस्ताव पाठविणेत आलेला होता. महानगरपालिका विधी सल्लागार यांचे दिनांक 21.06.2019 चे मार्गदर्शन प्राप्त झाले असुन यात “ लिफाफा क्रं.01 मध्ये अनुसुची-6 मध्ये मक्तेदाराच्या वतीने दिनांक 13.03.2019 रोजी हमीपत्र निविदेत भरण्यात आले असुन यात कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनी अहमदाबाद यांना कोणत्याही शासकीय / निमशासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेने काळया यादीत समाविष्ट केले नसल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे त्यांना पुढील कार्यवाहीस पात्र ठरविण्यात आले होते. तथापि तदनंतर त्यांचे बाबत प्राप्त तक्रारींनुसार खुलासा मागविण्यात आल्यानंतर सरदार सरोवर नर्मदा निगम लि. गुजरात यांनी दि.22.02.2019 ला सुरू केलेल्या डिबार च्या कारवाईस मे.उच्च न्यायालयाचे आदेशाने दिनांक 06.03.2019 रोजी तात्पुरते निलंबित केले आहे व तो आदेश वेळोवेळी कायम ठेवला आहे. त्यामुळे कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनी अहमदाबाद यांनी महानगरपालिकेकडे निविदा भरतांना सत्यपरीस्थिती लपवून कागदपत्रे सादर केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. मे. उच्च न्यायालयात दाखल प्रकरणातील विषय व त्यात वेळोवेळी होत असलेले आदेश पाहता, सदर प्रकरण गंभीर स्वरूपाचे आरोप असलेले आहे. कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनी अहमदाबाद यांनी निविदा दाखल करतांना खरी बाब महानगरपालिकेपासून लपवून ठेवलेली असल्याने प्रशासनाने त्याबाबत योग्य ती खबरदारी घेणे गरजेचे व महत्वाचे आहे ” असे नमूद केलेले आहे.

कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनी अहमदाबाद यांनी निविदेत नमूद केल्यानुसार दिनांक 14.03.2019 रोजी प्रतिज्ञालेख सादर केला असुन यात आमची कंपनी गेल्या 7 वर्षात कुठल्याही लवादकाच्या दाव्यात / मे न्यायालयाच्या दाव्यात सामील नसल्याचे लिहून दिले आहे, प्रत्यक्षात दिनांक 22.02.2019 पत्रानुसार झालेली DEBAR ची कारवाई, मे.न्यायालयात दाखल याचिका, दिनांक 06.03.2019 च्या दाव्यात झालेला स्थगितीचा आदेश, ही माहीती मक्तेदार यांनी निविदा सादर करतांना महानगरपालिकेच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक होते. सदर माहीतीचा घटनाक्रम मक्तेदार यांनी निविदा भरतांना दिलेला नाही असे दिसून येते. सदर कृती निविदा तरतूदींचे उल्लंघन करणारी आहे. मक्तेदार यांचे कडून महानगरपालिकेने खुलासा मागविला असता, मक्तेदार यांनी दिनांक 08.05.2019 च्या पत्राअन्वये त्यांचेवर सरदार सरोवर नर्मदा निगम लि गुजरात यांनी केलेल्या कारवाई विरूध्द दाखल केलेल्या याचिकेत मे.न्यायालयाने दिनांक 06.03.2019 रोजी (निविदा सादर करण्याआधी) स्थगिती दिली असल्याचे नमूद करून त्यांचेवर यापूर्वी झालेल्या कारवाई बाबत व सुरू असलेल्या दाव्याबाबत कबुली दिली आहे.

मे.न्यायालयाने या प्रकरणी अंतिम आदेश दिलेले नसून प्रकरण अदयापही न्याय प्रविष्ठ आहे. त्यामुळे यात अंतिम निकाल होण्यासाठी लागणाऱ्या कालावधीची शाश्वती देता येणार नाही. निविदा मागवितांना घेण्यात येत असलेली प्रमाणपत्रे, प्रतिज्ञालेख हे अश्या स्वरूपाच्या प्रकरणांत प्रलंबित असलेल्या कारवाईमुळे निविदा अंतिम करण्यास विलंब होवू नये या उददेशाने घेण्यात येतात. ही विधी सल्लागारांचे मत आणि या मताच्या अनुषंगाने महानगरपालिका प्रशासन या निष्कर्षा पर्यंत आलेले आहे की सदर कंपनीने महत्वाच्या बाबी या निविदा भरतांना महानगरपालिकेपासुन लपविल्या आहेत. हा मुद्दा ज्यावेळी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना लक्षात येतो आणि ही कंपनी बॅल्कलिस्टेड आहे अशा पध्दतीच्या तक्रारी सुध्दा यापुर्वी आपल्याकडे प्राप्त झालेल्या होत्या आणि प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने ही बाब सुध्दा ज्यावेळेला महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना कळविण्यात आली होती. परंतू महाराष्ट्र जीवन प्राधिकरणने सुध्दा त्याचेवर त्यांचे विधी सल्लागारांचे मत घेतलेले आहे. यामध्ये मक्तेदार कृष्णा कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद यांचे बाबत दिनांक 16.04.2019 रोजी तक्रारदार श्री.अजितकुमार मांगलाणी यांनी गुजरात राज्याच्या महामंडळाने कृष्णा कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद यांना काळया यादीत टाकलेले असल्याने अपात्र करावे अशी तक्रार केली होती. तसेच दिनांक 24.04.2019 रोजी श्री. रविंद्र बळीराम पाटील यांनी तक्रार केलेली असुन यात कृष्णा कन्स्ट्रक्शन यांनी निविदेत रू.500/- प्रतिज्ञापत्रावर काळया यादीत नाव नसल्याचे लिहून दिले असून प्रत्यक्षात सदर मक्तेदार यांना सरदार सरोवर नर्मदा निगम लि गुजरात यांचेकडून काळया यादीत टाकणेसाठी debar करण्यात आले असुन निविदा सादर करतांना दिलेली प्रमाणपत्रे सत्यप्रतिज्ञेवर दिली नसल्याची तक्रार केली आहे.

उपरोक्त तक्रारींची शहानिशा करण्यासाठी म.कार्यकारी अभियंता मजीप्रा विभाग जळगाव यांना दि.03.05.2019 रोजी कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर कामी मे. कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनी अहमदाबाद यांचे कडून दिनांक 03.05.2019 च्या पत्रानुसार खुलासा मागविण्यात आलेला होता. मक्तेदाराकडून दिनांक 08.05.2019 रोजी प्राप्त खुलाश्याची प्रत देखील मजीप्रा विभागास पुढील पडताळणी साठी दिनांक 09.05.2019 रोजी पाठविण्यात आलेली होती. मक्तेदार यांनी दिलेल्या खुलास्यानुसार मे. उच्च न्यायालय गुजरात अहमदाबाद बेंच यांनी दिनांक 06.03.2019 रोजी निर्णय दिला असुन त्यांनी सरदार सरोवर नर्मदा निगम लि गुजरात यांनी केलेल्या Debar व Stop payment च्या कारवाईस स्थगिती दिलेली आहे. मजीप्रा विभागाने दिनांक 11.06.2019 रोजी मजीप्राचे विधी सल्लागार यांचा सल्ला घेतलेला आहे. आयुक्त साहेब मी बोलतोय आपण ऐकत नसाल तर मी बसुन जातो.

मा.आयुक्त :- विषय अजेंडावरचा आहे ना.

श्री.नितीन लढढा :- कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनी अहमदाबाद यांचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे व दिनांक 06.03.2019 रोजीचे गुजरात उच्च न्यायालयाचे आदेशाने त्यांचे नाव काळया यादीत समाविष्ट करण्याच्या कारवाईस पुढील आदेश होईपावेतो स्थगिती दिली आहे. त्यामुळे कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनी अहमदाबाद यांना निविदेसाठी पात्र ठरविले ते योग्य आहे असे कळविले आहे. आता यामध्ये कॉन्ट्रसी आहे की जळगांव मनपाचा विधी सल्लागार म्हणतोय की या मक्तेदाराने जी माहिती पुरविलेली आहे ती चुकीचे माहिती आपल्याला सादर केलेली आहे , यांनी मनपास अंधारात ठेवलेले आहे आणि एकीकडे बी.एम.सी आहे आणि राज्य शासनाचे महाराष्ट्र जिवन प्राधिकरण हे त्यांच्या विधी सल्लागारांचे मत घेवुन ते त्यांना डिफेंट करत आहे आणि आपले विधी सल्लागारांचे मत यामध्ये विरोधाभास च्या भुमिकेमध्ये आहे, मग अशा भुमिकेमध्ये या सदस्यांना समाधान होणे गरजेचे आहे. या संदर्भात सुध्दा सत्य स्पष्ट होणे आवश्यक आहे, या कृष्णा ईन्फ्रास्ट्रक्चर च्या अनेक बाबी आहेत की त्या योग्य पध्दतीने तो तडजोडीचा मक्तेदार असेल आर्थिक क्षमतेच्या बाबतीतला असेल त्या योग्य पध्दतीने कुठल्याही प्रकारामध्ये योग्य पध्दतीमध्ये दिसुन येत नाही, ही गोष्ट जरी मान्य आहे, सदर मक्तेदार हा कॉपीराईट नाही, आपल्या विधी सल्लागाराच्या मताच्या अनुषंगाने म्हणा किंवा मनपाच्या प्रशासनाच्या अनुषगांने म्हणा आणि या वेळेला या मक्तेदाराचे काम रदद करावे आणि जो सेंकड आहे त्याला देण्याच्या संदर्भातमध्ये मक्ता देण्याची शिफारस या मक्त्यामध्ये शहर अभियंता यांच्या माध्यमातुन करण्यात आल्याचे दिसुन येते आणि या परिस्थिती मध्ये ही दुविधा मधील या सभागृहाची मानसिकता आहे की, एकीकडे आपल्यापेक्षा उच्च राज्यशासन त्यांनी नेमलेल्या महाराष्ट्र जिवन प्राधिकरण आणि त्यांनी नेमलेला त्यांचा वकील यात सर्वस्वी जबाबदारी जी आहे मुळात ही महानगरपालिकेला विधी सल्लागारांचा सल्ला घेण्याची सुध्दा गरज येथे दिसुन येत नाही. आणि ती गरज नसावी सुध्दा कारण आपण 5 कोटी रू. कन्सल्टंसी फी चे मोजतोय आणि आपण 5 कोटी रूपयांची एवढी मोठी रक्कम येणाऱ्या कंस्नट्रक्शन ला देत असतांना त्याच्याकडुन आपल्याला ही अपेक्षा नाही की हयांनी अश्या पध्दतीने सल्ले दयावे की त्यांनी दिलेला सल्ला आपण या सभागृहामध्ये अमान्य करावा आणि त्याच्या उपस्थितीत निर्णय घ्यावा हे अपेक्षित नाही. यासंदर्भात एम.जी.पी चा दुसरा मुददा आपल्या समोर आलेला आहे. आता यामध्ये खाते प्रमुखांनी सुचविल्या प्रमाणे जर कधी हा मक्ता रदद केला आणि जो एल-2 आहे आणि त्या एल-2 त्याच्या संदर्भात काम करण्याच्या संदर्भात प्रस्तावाच्या याच्यावरील पार्श्वभुमी चुकीची आहे परंतु तसे कायदेशीर अधिकार

स्थायी समितीला आहेत, निविदेच्या अटी , शर्ती मध्ये एक मक्तेदार काही कारणाने तो बिट करण्याच्या संदर्भात जरी कॉलीफाय झालेला असेल चुकीने तसे झाले असेल हा वेगळा भाग आहे, परंतु तो क्वालीफाईड झाला असल्याने परफॉर्मरस बँक गॅरंटी 1,69,86,941/- ची महानगरपालिकेला सादर केलेली असेल, अश्या परिस्थिती मध्ये आपण त्याला त्याच्या कडुन हे काम काढुन त्याचा मक्ता रदद करावा आणि एल-2 जो असेल त्याला काम दयावे ही निवदेच्या अटी शर्ती मध्ये आहे का ? आणि अश्या पध्दतीने हा निर्णय हे सभागृह घेवु शकते का ? तसा कायदेशीर अधिकार यासभागृहाला आहे का ? हा एक मुददा, दुसरे असे की याच्या संदर्भातील मनपाची भुमिका की साधारणत: अजितकुमार मांगलाणी यांची तक्रार दि.16/04/2019 ला महानगरपालिकेला प्राप्त झालेली आहे आणि मक्तेदार कृष्णा कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद यांनी दिनांक 22.04.2019 रोजी रू.1,69,86,941/- रकमेची Performance bank Guarantee मनपास सुपुर्द केलेली आहे. म्हणजे ज्या वेळेला मक्तेदार हा ब्लॅकलिस्टेड आहे याची शहानिशा कोणी करून न घेता मग त्याची बँक गॅरंटी कशी आपण स्विकारली कशा पध्दतीने करून घेतली. ही बँक गॅरंटी स्विकारतांना. ही सुध्दा आपली चुक आहे की, ज्यावेळेला एखादी तक्रार आपल्याकडे आलेली आहे, बँक गॅरंटी प्राप्त होण्या अगोदर तक्रार प्राप्त झालेली होती, तक्रार प्राप्त झाल्यानंतर तब्बल 6 दिवसांनंतर आपण Performance bank Guarantee चा आपण स्विकार करतो म्हणजे दोन महिन्यापंर्यत त्याच्या ब्लॅकलिस्टेड च्या संदर्भात आपण गंभीर नव्हतो. एम.जी.पी तर सुरूवाती पासुनच गंभीर नाहीये तर मग यापुढे काय होईल ? या सर्व प्रकरणामध्ये निविदा अटी शर्ती मध्ये अशी कुठलीच अट नाही की निविदामधील L-1 चे काम काढून घेऊन ते L-2 ला देणे हे पुर्णत: चुकीचे असेल. कारण यापुर्वीचा जो अनुभव आहे पाणी पुरवठया संदर्भातील ११ महिने न्यायालयात ही प्रक्रीया चालली त्यामुळे या कामाला 11 महिने उशिराने विलंब झाला. आणि त्याचे दुष्परिणाम हे असतील किंवा नसतील ते आपल्या डोळयादेखत आहेत. आणि तिच चुक पुन्हा करण्या संदर्भातील भुमिका जर या सभागृहासमोर आज येत असेल आणि ती आपण स्विकार करीत असु कारण ज्या व्यक्तीने निविदा भरलेली आहे आणि निविदा पुर्ण करण्याची संपुर्ण जबाबदारी तांत्रिक दृष्टया किंवा आर्थिक दृष्टया ही संपुर्ण मजिप्र ची असल्याने त्यांनी त्याला क्वालीफाईड केलेले आहे म्हणजे एक स्वराज्य संस्था त्याला क्वालीफाईड करते आणि त्याच्या पेक्षा कनिष्ठ असलेली संस्था त्याला डिस क्वालीफाईड करते आहे हे प्रकरण निश्चित पणे न्यायालयात जाईल आणि ज्यावेळेला प्रकरण न्यायालयात गेल्यानंतर दोन गोष्टी आहेत एक तुमचे सगळया गोष्टीत हो आहे की ही कंपनी खऱ्या अर्थाने योग्य कंपनी नाहीये हे मी मान्य करतो की या कंपनीला काम देण्यात येवु नये हा निष्कर्ष आपण याठिकाणी काढलेला आहे, परंतु या कंपनीला कुठेतरी कायदयाचे बंधन लावुन जर न्यायालयामध्ये जाण्याची संधी उपलब्ध झाली आणि न्यायालयाच्या संधीमुळे जर कधी उच्च न्यायालयाने म.जि.प्रा.ने घेतलेला निर्णय योग्य आहे, तसेच त्यांच्या विधी सल्लागाराने घेतलेला निर्णय योग्य आहे हे जर उच्च न्यायालयाने ठरवुन दिल्यास तर परिणाम काय होईल की या हायकोर्टाने या मक्तेदाराला क्वालीफाईड केल्यानंतर आपल्याला सदर मक्तेदारास नाईलाजाने कार्यादेश दयावे लागतील आणि आपण हात दाखवुन गेल्यासारखी परिस्थिती या ठिकाणी या शहराची होईल . आणि कुठलाही मोठा अनुभव या मक्तेदाराच्या पाठीशी नाहीये हे सत्य आहे परंतु आपण कुठेतरी आपण नियमांच्या दुर्लक्षपणा किंवा नियमांकडे डोळेझाक पणा की आपली जी भावना आहे की नविन काही तडजोडीचा आपल्या मनामध्ये जो विचार आहे की, संपुर्ण प्रकरणामध्ये मक्तेदारा सोबत घेवुन नविन निविदेचा अवलंब केला तर साधारण त्यामध्ये दोन तीन महिन्यांचा कालावधी लोटला जाईल, मी सहमत आहे तुमच्या मताशी परंतु साहेब कसे आहे आज जर आपण या दोन महिन्याच्या कालावधीचा विचार केला तर हे प्रकरण न्यायालयामध्ये दोन महिने जातील की दोन वर्षे जातील याची ग्वाही आपल्याला देता येत नाही आणि तश्या परिस्थिती मध्ये जर कधी मे. कोर्टाचे निवाळे बघतो आपण सेम मॅटर्स मध्ये वेगवेगळया केस मध्ये वेगवेगळया प्रकारचे निर्णय असतात कारण शेवटी तो ओपीनियन आहे एखादा न्यायाधिश त्या खुर्चीवर विराजमान झालेला आहे त्याला काय योग्य वाटत त्याच्यावर कायदयाचे फीक्सेशन होते जर त्यांना योग्य वाटले की कृष्णा ईन्फ्रास्ट्रक्चर जर काही तांत्रिक बाबी मध्ये त्याला एम.जी.पीने त्याला तांत्रिक बाबीमध्ये डिसक्वालीफाईड केले असते तर त्याने दोन कोटी रू.ची बँक गॅरंटी सादर केली नसती आणि बँक गॅरंटी सादर करतांना मनपाने ही कुठेतरी दुर्लक्ष केले आहे आणि त्याच्यामध्ये सगळयात मोठा आणि ज्या मुदयावर शंका उत्पन्न होईल तो मुददा प्रकर्षाने कोर्टासमोर आणला जाईल. कुठेतरी त्याचे गांभीर्याने विचार केला जाईल. एक दुसरे असे या संदर्भात आज जे स्थायी समिती समोर हा विषय चर्चेला आलेला आहे निर्णय प्रक्रीया अजुन यावर व्हायची आहे. मे.सभागृह यावर काय निर्णय घेईल हे तुम्हालाही माहित नाही व मलाही माहिती नाही परंतु हा संपुर्ण प्रस्ताव हे दर्शवतो की ही निविदा प्रक्रीया 100 टक्के रदद होणार आहे आणि 100 टक्के रदद होणार आहे असे गृहीत धरून अहमदाबादची दुसरी कंपनी जी एल -2 आहे जीचे नांव आहे एल सी ईन्फ्रा प्रोजेक्टस प्रा लि अहमदाबाद या कंपनीचा दि.22/06/2019 चा प्रस्ताव पत्र आपल्याला दिलेले आहे की एल -1 च्या दरामध्ये काम करण्यास आम्ही तयार

आहोत हे स्वप्न त्या कंपनीला कुठे पडले साहेब हा विषय संशोधनाचा आहे. सगळयांच्या निविदा आल्या असतील परंतु हे कोण बघणार त्यावेळेला की यामागे तुमच्या भावना काय होत्या कींवा सभागृहाच्या भावना काय होत्या. ज्यावेळेला एखादी निर्णय प्रक्रीया या सभागृहामध्ये अंतिम होत नाहीये आणि अंतिम होण्याच्या तिन दिवस अगोदर एल-2, एल.सी.ईन्फ्रास्ट्रक्चर हा महानगरपालिकेला पत्र देतोय की मी एल -1 च्या मक्तेदाराच्या दरात काम करण्यास तयार आहे म्हणजेच याचा अर्थ असा होईल हे संपुर्ण कुठेतरी षढयंत्रचा भाग आहे. ही टोटल फॅक्ट आहे. जो मक्तेदार की ज्याचे काम रद्द होईल तो निश्चित पणे हा मुददा कोर्टासमोर उभा करेल की ही संपुर्ण प्रक्रीया राज्य शासनाच्या मराप्र कडुन क्वालीफाईड केल्यानंतर यांना हे काम एल-2 जो आहे एल सी ईन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना देण्याच्या संदर्भातील नियोजनाचा हा एक भाग आहे आणि या अनूषंगाने मला डिसक्वालीफाईड करण्याच्या संदर्भातील भुमिका ही स्थायी समितीच्या सभेमध्ये घेण्यात आलेली आहे आणि मला डिसक्वालीफाईड करून एल-2 ला काम देणे हे त्याच्या दि.22/06/2019 च्या पत्राच्या अनुषंगांने कोर्टामध्ये वापरली जाण्याची शक्यता सुध्दा नाकारली जात नाही. आणि यामुळे हा संपुर्ण विषय यातील अभिप्राय प्रामाणिक ही असतील परंतु ज्या पध्दतीचे प्रस्ताव आणि ज्या पध्दतीने निविदेचे अटी शर्ती या सगळया गोष्टींचा जर आपण येथे विचार केला तर कुठेतरी या प्रक्रीयेमध्ये हे एल-2 ला काम देणे हे नियमबाहय व चुकीचे ठरेल व आक्षेपार्ह असेल. भविष्यात न्यायालयाचे ताशेरे सुध्दा येतील. निर्णय घेणारे घेवु शकता यामध्ये ही काही दुमत नाहीये. अशा पध्दतीने ही प्रक्रीया पुन्हा ही प्रक्रीया काही कालावधीसाठी लांबविली जाईल. तो कालावधी कीती आहे ते तुम्हालाही माहिती नाही व मलाही माहिती निश्चित पणे माहिती नाही तसेच सभागृहातील सदस्यांनाही माहिती नाही तर माझी या अनुषगांने हीच विनंती आहे की या महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीकोणातुन व या शहराच्या हिताच्या दृष्टीकोनातुन आणि ही संपुर्ण प्रक्रीया पारदर्शीपणे राबवली गेली पाहीजे. अश्या पध्दतीने या संपुर्ण निविदा प्रक्रीया रदद करून नव्याने पुन्हा जाणे ही खुप योग्य गोष्ट होईल व नियमानुसार होईल तसेच कुणाला याकडे बोट दाखविण्याची संधी निर्माण होणार नाही आणि उदया जर कुठे ताशेरे निघाले काही विपरीत घडले शेवटी नागरीक या सन्मा.सदस्यांकडे बोट दाखवितात की हे सभागृहातील सदस्य काय करतात आणि मग कालांतराने आमचा हेतु हा कसा हेतु होता हा कीतीही घसा कोरडा करून सांगीतले तरी त्यावेळेला नागरीकांचा विश्वास आपल्यावर बसत नाही. आणि अजुन एक विनंती आहे की म.जि.प्रा ही जरी महाराष्ट्र शासनाने बी.एम.सी कडुन नेमलेली असेल यापुर्वीचा आणि आत्ताचा दोघेही अनुभव पाहता, या बी.एम.सी.ला रदद करण्यासंदर्भाची भुमिका या सभागृहाने स्विकारली पाहीजे आणि त्या संदर्भातील रिकमंडेशन सुध्दा मा.आयुक्त साहेब आपण राज्यशासनाकडे मांडु शकता परंतु आपण परिस्थिती काय आहे हे सांगु शकत नाही मांडु शकत नाही परंतु ऑन रेकार्ड शासनाकडे आपण मांडु शकत नाही. परंतु आपण मला सांगा की 74 व्या घटना दुरूस्तीमध्ये महानगरपालिकेला स्वायतत्ता देणेसंदर्भात जास्तीत जास्त अधिकार देण्याच्या संदर्भाची भुमिका 74 व्या घटना दुरूस्तीमध्ये करण्यात आलेली आहे, परंतु एक समजत नाही की एका हाताने दयायचे आणि दुसऱ्या हाताने ओढुन घ्यायचे अश्या पध्दतीचे निर्बंध राज्य शासनाने लावणे हा एक प्रकारे महानगरपालिकेच्या अधिकारांवर घाला आहे. मला सांगा इतक्या चांगल्या चांगल्या बी.एम.सी आहेत इतक्या चांगल्या चांगल्या कंन्सलटंसी एजन्सी आहेत आणि इतकी मोठी रक्कम ज्यावेळेला आपण मोजतो त्यावेळी हे बघा, ज्यावेळी आपले प्रशासन वन साईड परसन असणे एकीकडे आपण आपले प्रशासन एका झापडयामध्ये काम करीत असते त्याच पध्दतीने मजिप्र, ते आपण बघीतले आणि त्याच पध्दतीने जी परिस्थिती आहे याच्यापेक्षा भयंकर परिस्थिती तेथे आहे. तेथे कोणाला क्वॉलीफाईड करायचे त्याचेही दर ठरलेले आहेत आणि कोणाला डिसक्वालीफाईड करायचे याचे सुध्दा दर ठरलेले आहेत. त्यांना फक्त कागदे रंगवायचे आहेत तुम्ही सांगीतले की हयाला दया ते ओके करतात. तुमच्या पेक्षा जास्त पैसे देईल हा विषय आहे तोही ओके करतात. तुम्हाला बाजुला केले, याला दिले. अशा एजन्सीच्या माध्यमातुन आपण आपल्या महानगरपालिकेचा व या शहरातील जनतेचा पैसा अश्या पध्दतीने चुकीच्या बी.एम.सी वर खर्च करणे ही मला वाटते की चुकीची बाब आहे. पुनश्च म्हणतो की आपण मा.गिरीषभाऊंना सुध्दा विनंती करू की, आपण शेवटी या शहराच्या भविष्याचा विचार करता योग्य गोष्टीसाठी आपण पैसे मोजतोय आणि पैसे मोजत असतांना अशा पध्दतीने चुकीच्या मक्तेदाराला डिसक्वालीफाईड असतांना त्याला क्वालीफाईड करणे आणि या संपुर्ण प्रकरणामध्ये गोधंळाची स्थिती निर्माण करणे हे मला वाटते की योग्य नाही. तर माझी या सभागृहाला विनंती आहे की, आपण यासंदर्भात या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करावा आणि गांभीर्याने विचार करून या निविदा प्रक्रीयेला पुर्णत: रददबातल करून, कारण शेवटी काय आहे की, निर्णय घेण्याचे अधिकार निविदे प्रक्रीयेच्या अटी शर्ती मध्ये कुठे नाहीत आणि ज्या गोष्टी अटी शर्ती मध्ये नाहीत त्या आपण देण्याचा ज्यावेळेला प्रयत्न करतो तर न्यायालयामध्ये या अनुषगांने अन्याय झालेला मक्तेदार उच्च न्यायालयामध्ये या सगळया गोष्टी ज्यावेळेला आणेल, त्यावेळेला आपल्याला बोलायला स्कोप राहणार नाही. आणि पुन्हा त्यावेळी हीच

परिस्थिती निर्माण होईल आणि उच्च न्यायालय आदेश देईल की ही निविदा प्रक्रीया पुन्हा नव्याने राबवा आणि त्यावेळेला. परंतु या सगळया गोष्टींमध्ये जाणारा वेळ व सगळया गोष्टींचा विचार करता आपण या गोष्टींचा विचार करावा अशी माझी या सभागृहाला विनंती आहे. आणि मी जी भुमिका या सभागृहापुढे एम.जी.पी.च्या बाबतीत जी भुमिका मांडलेली आहे त्या भुमिकेचा ही विचार या सभागृहाने करावा. आपल्या भावना मा.आ.गिरीषभाऊ महाजन यांना सुध्दा कळवु मा.मुख्यमंत्रींना सुध्दा कळवु की, अश्या पध्दतीने ही स्वायत्ता जी महानगरपालिकेची आहे त्यांना त्यांचे बी.एम.सी चे अधिकार दयावे की, या शहराच्या हिताच्या दृष्टीकोनातुन एक चांगली निविदा प्रक्रीया राबविणे योग्य होईल .

मा.सभापती :- अजुन कुणाला काही बोलायचे आहे का .

म.आयुक्त :- याच्या व्यतिरीक्त काही मुददे असतील तर ते हे सांगावे मी त्याचे निराकरण करण्याचे प्रयत्न करेल. आपण त्या अनुषगांने उपस्थित मुददे आहेत, जसे की या प्रस्तावाच्या पार्श्वभुमिला प्रशासनाचे स्पष्ट मत नाही, आंतरलेखा परिक्षकांचे काही ऑब्जरवेशन दिसुन येत आहे, तर ते वाचल्यानंतर मलाही दिसुन येते. पण आज या ठिकाणी या सभागृहाच्या माध्यमातुन आज या ठिकाणी जी काही वस्तुनिष्ठ स्थिती आहे ती मी या ठिकाणी मांडु ईच्छितो. कोणतीही निविदा प्रक्रीया पार पाडतांना संबंधित जो ठेकेदार आहे. त्याला संपुर्ण निविदेचे संच दिलेले असतात. आणि त्या निविदा संचाची संपुर्णपणे माहिती त्याने घेवुन निविदा भरणे अपेक्षित असते. तर त्या प्रक्रीयेमध्ये ज्या काही चार निविदा आलेल्या आहेत ज्या रेकॉर्ड वर नाहीत आम्ही संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. सदर या संबंधी सुध्दा निर्णय घेण्याचे अधिकार आहेत . क्वचित मान्य करून कंन्संलटंट नेमुन निविदा आपण मान्य करतो. म.जि.प्रा. ही राज्य शासनाने नेमलेली एजन्सी आहे त्याच्या बाबतीत काही ऑब्जरवेशन्स आपले जे काही आहेत त्याला सुध्दा काही बाबतीत मी सहमत आहे. ही जी एम.जी.पी. संस्था आहे ही बऱ्याच कालावधी पासुन स्पेशलाईज एजन्सी म्हणून काम करते आहे. म्हणजे ज्या ज्या वेळेला राज्य शासनानंतर पाणी पुरवठा आणि मलनिस्सारणाच्या बाबतीत कोणताही जो विषय येतो त्यावेळेला यांना एक्सपर्ट म्हणुन तिथे बोलवले जाते. आजपर्यंतचा आपला आणि माझा या मजिप्रा बाबतीचा अनुभव बघीतला तर तो फारसा समाधानकारक नाही. मी ज्या शहरात काम केले त्याठिकाणी आठ वर्षापुर्वी यांना जी जबाबदारी दिली होती त्याठिकाणी बराच खर्च झाला त्याच्या 20 वर्ष ते काम ही बरेच वर्ष चालले. अमृत योजना ही केंद्र शासनाची योजना आहे. आणि शहरामध्ये काही सोयी सुविधा त्या वेळीच नागरीकांपर्यंत पोहचाव्यात . त्या हेतुने ही योजना आहे. आपली पाणी पुरवठयाची योजना प्रगती पथावर आहे. त्यानंतर आताचे जे पाणी पुरवठयाचे नियोजन आहे सदया अडचणीचा काळ आहे परंतू काही दिवसांनी पाणी पुरवठा दुप्पट होणार आहे आणि त्यावेळी खऱ्या अर्थाने ड्रेनेजची खरी गरज भासणार आहे. आपण आजपर्यंतचा कालावधीचा विचार बघीतला या स्टेजपर्यंत यायला दोन एक वर्षाचा कालावधी लागलेला आहे किंवा यापेक्षा जास्त कालावधी लागलेला आहे. त्यामुळे ही योग्य वेळ आहे निर्णय घेण्याची. आपण काय निर्णय घेणार आहांत तो आपण घेणार आहोत. यामध्ये जे जे मुद्दे उपस्थित केले त्यामध्ये एल -१ हा सक्षम नाही हा एक मुद्दा होता. आमचं म्हणणं असं आहे की, तो कागदोपत्री सक्षम आहे, सी.ए.चे पत्र दिले आहे. त्याचा टर्न ओव्हर आहे हे सगळ दिलेले आहे, दुसरा मुददा लिगल जो आहे. एखादी वस्तु त्याला जर कोर्टाने स्टे दिला, त्याच आजचे स्टेटस जे आहे की त्याला काही कंम्पलेंट आलेली नाही. उदया त्याचा निकाल काय लागणार हे आपल्याला माहित नाही. कोर्ट केस चालु आहे हा विषय त्याच्या ताब्यात आहे त्याचा जो प्रथम डिमांड करण्याचा आहे त्यापुर्वी म्हणजे आपण त्याच्या आत मध्ये आपण शिरत नाही किंवा त्याच्यावर ऍ़क्शन करत नाहीत काम कमी आहे किंवा जास्त आहे अश्या काही गोष्टी आहेत म्हणजे एल-1 च्या बाबतीत त्याची सक्षमता हा मुददा कागदोपत्री जरी योग्य असला तरी आपल्या निविदा संचामध्ये तसेच निविदेच्या अटी शर्ती मध्ये अशा काही ऍ़फीडेव्हिट किंवा घोषणापत्र आहेत ते पान नं. 20 किंवा 46 वर असेल या संदर्भातील माहिती त्याला सत्य प्रतिज्ञेवर दयायची आहे, आपल्या या निविदेमध्ये निविदा सादर करण्याचा शेवटचा दिनांक .13/02/2019 होता डिबार ची जी तारीख होती 22/02/2019 म्हणजे ज्यावेळेला त्याने निविदा भरली त्यावेळेला त्याला माहिती असतांना सुध्दा त्याने निविदा भरली आणि आपल्या अटी शर्ती मध्ये आहे की, तुमच्या काही मागण्या असतील तर त्या तुम्ही दयायची आहेत, वस्तुस्थिती पाहीजे. की असे होते की स्टे दिलेला आहे तर ती वस्तुस्थिती मान्य आहे. आपल्याला त्यांनी जे कागदपत्रे दिलेले आहेत त्या दोन्ही ठिकाणी त्यांनी माझेवर कुठलेही बॅन वगैरे नाही असे नमुद केले आहे. न्यायालयीन कुठलीही कार्यवाही नाही असे दिलेले आहे आणि एवढया ऐकमेव मुद्दयावर आपल्याला त्यासंबंधी हा महत्वाचा भाग आहे. त्यामुळे एल-१ च्या बाबत माझं स्पष्टीकरण अशा पध्दतीचे आहे. दुसरा जो मुद्दा आहे एल-2 च्या बाबतीत ज्यावेळला एल-2 असा म्हणतो की मी एल-1 दरामध्ये काम करण्यास तयार आहे त्यावेळेला आपल्याला आर्थिक जी वाढ असते त्यासंबंधी आपल्याला काही तोशिश पडत नाही. जर तो तयार असता तर आता ज्या सभागृहाच्या भावना व्यक्त झाल्या त्याप्रमाणे आपल्याला दुसरा पर्याय काहीच

नव्हता म्हणजे फेर निविदाच आपल्याला काढावी लागली असती म्हणजे या केस मध्ये त्यांनी आपल्याला कळवलं आहे की, मी एल-1 च्या दरामध्येच काम करण्यास तयार आहे व मला संधी दिली. आता हयाबाबतीत अमृत योजनेच्या संदर्भात आपल्या सभागृहाने पाणी पुरवठयाची निविदा प्रक्रिया राबवलेली आहे. स्थायी समिती यासाठी सक्षम समिती आहे याच्याबद्दल कुणाचे दुमत असणार नाही. कारण कोणतेही टेंडर आपण स्थायी समितीच्या मान्यतेनेच पुढे काढत असतो. यानंतर एमजीपीने दोन मुद्दे दिलेले आहेत. एमजीपीचा वकील काय बोलतो फक्त स्टे बद्दल बोलतो बाकी काहीच बोलत नाही कारण त्याला तेवढंच विचारले गेल आहे. संपुर्ण जे काही मुद्दे आहेत ते आपण स्वत: पाहण्याची जबाबदारी एम.जी.पी.ची किंवा त्यांचे वकीलाची होती. म्हणजे एम.जी.पी.चा वकील आणि महानगरपालिकेचा वकील एकाच मुद्दयावर दोघं एक होत नाही म्हणजे एम.जी.पी.चा वकील म्हणतात की त्याला हायकोर्टाने स्टे दिलेला आहे आणि तो बँडेड आहे, आपणही मान्य करतो त्याला काही आपण नाही म्हणत नाही. स्टे असल्यामुळे तो भरु शकतो. मुद्दा हा आहे की, त्याने जी माहिती लपवली आहे त्याबद्दल आरोप आहे आणि आपल्या वकीलाने तोच मुद्दा पॉईट नोट केलेला आहे की, ज्यावेळेला निविदा प्रक्रियेच्या आधीच हायकोर्टाने निर्देश दिलेला होता, ते त्याने दाखवणे गरजेचे होते. दुसरा जो मुद्दा आहे एल-1 ने काही छोटी कामे केलेली आहेत १२, १४ कोटीची ती कामे एमजीपीनेच केलेली आहेत पण ती कामं होवुन बघुन तीन वर्ष पुर्ण झाल्यानंतर देखिल संबंधीत नगरपालिकांनी ती स्किम ताब्यात घेतलेली नाही. त्याच्या सक्षमतेचा आजचा विषय नसला तरी ते आपल्याला माहिती असणे गरजेचे आहे. तरी आपल्याला असा अनुभव येतो आहे की जी सक्षम एजंसी आहे अशा कामाच्या बाबतीत, पाणी पुरवठयाच्या बाबतीत किती अडचणी येत आहेत. त्यांना किती अडचणी येत आहे आणि अशीच जर परिस्थिती राहीली तर पुढील 5 ते 10 वर्ष ही योजना अशाच प्रकारे प्रगती पथावर आहे असेच आपल्याला म्हणावे लागेल. दुसरी गोष्ट अशी आहे, एल.सी.ईन्फ्रा ही जी कंपनी आहे हीने पुर्ण सोलापुर शहरातला स्मार्ट सिटीचा एक प्रोजेक्ट अगदी कमी कालावधीत पुर्ण केलेला आहे. म्हणजे एल-२ चे मी कुठेही समर्थन करीत नाही, जी वस्तुस्थिती आहे ती सभागृहाला समजणे गरजेचे आहे म्हणुन सांगत आहे. आयुक्तांचा आणि मुख्यलेखापरिक्षकांचा स्पष्ट अभिप्राय, खातेप्रमुखाच्या पुर्ण प्रस्तावामध्ये शेवटचा जो पॅरा आहे, त्यामध्ये स्पष्ट उल्लेख केलेला आहे की, हा निर्णय घेण्यास हरकत नाही. तसेच स्थायी समिती पुढे मान्य करणेस पाठविणेस हरकत नाही. प्रशासनाचे संकेत जनरली असे असतात की, ज्यावेळेला खालचे अधिकारी लिहीतात, वरच्या अधिकाऱ्यांनी फक्त सही केली याचा अर्थ ते मान्य आहे. आणि जेवढया हे असतील ते सोडुन दयायचे जसे अ प्रमाणे मान्य आहे. आणि जर मान्य नसेल तर तसे स्पष्ट लिहीले जाते. जरी हे कागदोपत्री असे स्पष्टपणे या प्रस्तावावर प्रशासनाची मान्यता आहे किंवा नाही ? तर प्रशासनाची या प्रस्तावाला पुर्णपणे मान्यता आहे. या ठिकाणी आंतरलेखापिक्षक आहेत त्यांच वेगळ मत असेल तर त्यांना ते मांडण्याची मुभा आहे कारण ते स्वतंत्र पणे आंतर लेखापरिक्षक म्हणुन काम करीत आहेत पण आर्थिक बाब व आत्ताची कायदेशीर बाब जर विचारात घेतली तर महानगरपालिकेवर कुठलाही बोझा होणार नाही. अजुन एक महत्वाची बाब म्हणजे कळीचा मुददा आहे की, स्थायी समिती ने ही शिफारस केली, ही निविदा स्विकारण्याची, तरीही आपण लगेच त्याला वर्क ऑर्डर देणार नाहीत कारण हा प्रस्ताव शासनाकडे जाणार आहे. शासनाकडे प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती असते तसेच एमजीपी चे अधिकारी ही असतात तसेच फायनान्स डिमार्टमेंटचे लोक असतात. आणि त्या समितीला योग्य वाटेलतर ते करतील आपण दिले म्हणुन ते हे करणार नाहीत. जर हे योग्य आहे किंवा नाही हे तपासुन एल-1 चे करतील ते काही आपण सांगु शकत नाही. त्यानंतर पुढची बाब म्हणजे अमृत ची जी योजना आहे किंवा केंद्र शासनाच्या ज्या काही योजना आहेत त्यामध्ये मुख्यसचिव त्या समितीचे अध्यक्ष असतात आणि त्या समिती पुढे हा प्रस्ताव जातो. मुख्यसचिव अध्यक्ष, प्रधान सचिव, नगरसचिव विभाग हे सदस्य सचिव असतात वित्त विभागाचे व ईतर विभागचे सचिव त्यामध्ये सभासद असतात. आणि त्यापुढे जर प्रस्ताव मान्य झाले तर त्यापुढे कार्यवाही होते. त्यामुळे स्थायी समितीची सक्षमता, स्थायी समितीची शिफारस आणि हया पुढील कार्यवाही हया माझ्या सांगण्यामुळे स्पष्ट झालेल्या असतील तर आपण जर शिफारस केली तर पुढे जाईल, नाही जर शिफारस केली तर, पुन्हा हा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावाच लागेल. समजा जर शासनाने एल-1 लाच दिले तर आपल्याला त्याप्रमाणे गाईड लाईन करावी लागेल. शासनाने मान्यता दिली तर त्याप्रमाणे पुढे गाईड लाईन करावी लागेल आणि हे जर सगळ केल तर मागच्या निविदेच कामा बाबत मला नाही वाटत की पुढील 6 महिने यामध्ये पॉझीटीव्ह निर्णय घेता येईल किंवा त्यामधे एवढा कालावधी जातो. तसेच नविन आलेला डी.एस.आर. आपल्यामुळे त्याच्याप्रमाणे विकास करावे लागेल. उदया आज जो 6 टक्के बिलो आहे तो कदाचित ऍटपार आला किंवा 2 टक्के आला किंवा तर ती जबाबदारी कोणी स्विकारायची हा सुध्दा प्रश्न आहे .

श्री.नितीन लढढा :- एम.जी.पी ने स्विकारावा साहेब.

मा.आयुक्त :- नाही एम.जी.पी. ही एक एजन्सी आहे.

श्री.नितीन लढ्ढा :- या सर्व प्रकरणात गोंधळ निर्माण करण्यासाठी एम.जी.पी. 100 टक्के जबाबदार आहे . एम.जी.पी.ने ज्यावेळी याचा आर्थिक लिफाफा क्रं. १ उघडला त्यांची जबाबदारी होती, कर्तव्य होते. त्यांनी योग्य पध्दतीने कायदेशीर रित्या स्क्रुनिटी करणे गरजेचे होते आणि स्क्रुनिटी करून ज्या निर्णया पर्यंत आपण स्वत: आलोय ही जबाबदारी त्यांची होती. त्यांनी या कृष्णा कन्स्ट्रक्शनला तांत्रिक बाबीत जर कधी बाद ठरविले असते तर हा त्या स्टेजवर आला नसता याचा आर्थिक लीफाफा उघडण्याचा प्रश्नच आला नसता आणि ही चुक त्यांनी केली. आणि भविष्यात जर कधी याची फेर निविदा झाली आणि त्याच्यातही नुकसान झाले तर मी म्हणतो की त्याचा सुध्दा ठराव झाला पाहीजे की याची जबाबदारी एम.जी.पी.चे जे कोणी सक्षम अधिकारी असतील की ज्यांनी अकार्यक्षम पध्दतीने आपल्या पदाचा कुठेही डोक्यामध्ये भान न ठेवता चुकीच्या पध्दतीने निर्णय घेतले की, ज्याच्या साठी एवढी मोठी रक्कम त्यांना महानगरपालिका देय्य होती अशा कुठल्याही गोष्टींचा विचार न करता घेतलेल्या निर्णयाने या महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान करीता त्यांना जबाबदार आणि दोषी धरण्यात यावे अशा पध्दतीची सुध्दा भमिका या महानगरपालिकेने स्विकारायला पाहीजे. कारण ही बाब मोठी आहे निश्चीत मोठी आहे. मला कुठल्याही एजन्सीशी काही घेणे देणे नाही. पण योग्य व पारदर्शक पध्दतीने या निविदा प्रक्रीया पुढे जायला पाहीजे. याच्यामध्ये कायदेशीर बाबी कुठेही उदभवता कामा नये. कारण आज येथे मंजुर होवुन राज्य शासनाकडे गेल्यानंतर जर राज्य शासनाने सांगीतले की, त्यांनी आधीच्या कृष्णा ईन्फ्रास्ट्रक्चर लाच काम देण्याचा निर्णय घेतला तर आपण काय करणार ? हे सगळ आपल्या समोर घडल म्हणजे सगळे रामायण आपल्या डोळया समोर घडल्यानंतर आपण हतबल राहु की हा काय निर्णय झाला. आणि तश्या निर्णयाची शक्यता नाकरता येत नाही. अश्या पध्दतीचा निर्णय संतोष ईन्फ्रास्ट्रक्चरच्या बाबतीत निर्णय घेतलेला होता. राज्य शासनाच्या हायपॉवर कमिटीने प्रकरण उच्च न्यायालयात गेले संतोष ईन्फ्रास्ट्रक्चर रदद झाले काम दुसऱ्या कंपनीला दिले. म्हणजे आपण असे गृहीत धरीत नाही कि असे होवु शकणार नाही. तुमच्या भावनेशी मी 100 टक्के सहमत आहे, तुमचे अत्यंत प्रामाणिक प्रयत्न आहेत या योजनेला कुठेतरी मुर्त स्वरुप जितक्या शक्य होईल तितक्या लवकर देण्याच्या दृष्टीने आपली भुमिका असेल किंवा आपल्या अधिकारींची असेल ही भुमिका वाखण्याजोगी आहे. परंतु कायदयाच्या कचाटयात जर ही योजना अडकली तर आपण जितका वेळ जीव जेथे काढतो आहे लवकरात लवकर निविदाचा मर्च होण्याच्या दृष्टीने तिचा एंड तुम्हालाही कल्पना नाही व आम्हालाही कल्पना नाही आणि ती परिस्थिती येवु नये म्हणून मी माझे निवेदन या सभागृहापुढे ठेवले. कारण दोन गोष्टी आहेत, ज्या पध्दतीने निविदा प्रक्रीयेच्या अटी शर्ती मध्ये एल-2 ला झुलवायचे आणि काम दयायचे हा अटी शर्तीचा भाग नाही. हा निर्णय आपण सभागृहात घेवुन राज्य शासनाकडे रिकंमेंड करतो अंतिम निर्णय राज्य शासन घेईल याबाबत काही दुमत नाही. परंतू आजच्या स्थितीला आलेल्या निविदा स्विकारणे किंवा नाकारणे हे सर्वस्वी अधिकार या सभागृहाचे आणि आपल्याकडे अबाधित आहेत. निविदेच्या अटीशर्ती प्रमाणे म्हणजे आज तुमच्या आणि आमच्या आवाक्यात आयुधे आहेत उदया जर आपली ही आयुधे रिकामी झाली आणि पुन्हा राज्य शासनाकडे या व्यक्तीने ज्या पध्दतीने एम.जी.पी.ला घोळुन, गोंजारून, कुस्कारुन ज्या पध्दतीने स्वत:ला कॉलीफाईड करण्याची भुमिका करून गेला. होवु शकते की तो पुढे सुध्दा जाण्याच्या संदर्भात त्याची भुमिका जी आहे ती याच्या पुढे सुध्दा सुरू ठेवेल हा झाला एका जणाचा विषय. ज्यावेळेला आपण एल-2 ला पाचारण करतोय किंवा एल-2 ने अव्हेरनेस दाखविले ही संधी उदया दुसरा, तिसरा मक्तेदार एकूण 4 मक्तेदार या प्रक्रीयेमध्ये सामील झालेले आहेत. एकाला निष्फळ केल्यानंतर आपण दुसऱ्याला संधी दिली ती संधी कायदयाच्या चौकटीत न राहता आपण दिली आणि मग तशा संधीचा उर्वरित दोन मक्तेदार अपेक्षा ठेवतील कि, ही संधी समान न्याय तत्वाने आम्हाला सुध्दा उपलब्ध करून देणे गरजेचे होते आणि मग तुम्ही ही संधी आम्हाला उपलब्ध करून दिली नाही. तुमच्या निविदा अटी शर्ती मध्ये जर कधी पहिला काही कारणाने अक्षम्य राहीला असता काम सुरू करण्याच्या संदर्भात किंवा बँक गँरंटी देण्याच्या संदर्भात किंवा स्वत:हुन काम सोडण्याच्या मानसिकतेत असता तर निश्चितच आपण एल-2 ला पाचारण करतोय. क्रं.३ चा असलेला किंवा क्रं. 4 वर असलेला हा मक्तेदार सुध्दा न्यायालयामध्ये जावु शकतो. आणि तिथे सुध्दा तो आपली भुमिका मांडु शकतो की, येथे एल-2 ला पाचारण करण्यात आलेले आहे जर आम्हाला या ठिकाणी आम्हाला जर संधी दिली असती तर आम्ही यापेक्षा कमी दरामध्ये काम कले असते . शेवटी व्यवसायात काय असते सर, काही समजा आपण पुस्तके घ्यायला गेलो की एक म्हणतो की 125/- रूपये मध्ये देतोय तर दुसरा म्हणतो की 100/- रू मध्ये दिली असती, अश्या पध्दतीची परिस्थिती निर्माण होवु नये आणि संपुर्ण कायदेशीर याच्यातुन ही योजना अडकु नये ईतका विलंब वाचविण्याच्या दृष्टीकोनातुन आपण सर्वजण खटाटोप करत आहोत त्या प्रकरणाला कुठेतरी फाटा फुटला जावु नये आणि ही योजना जळगांव शहरासाठी लवकरात लवकर कशा पध्दतीने आणि पारदर्शी पध्दतीने कशा प्रकारे कार्यान्वित करता येईल. जरी याला दोन महिन्याचा विलंब होईल किंवा यापेक्षा जास्त कालावधीही लागू शकतो ज्या पध्दतीने

एल.सी.ईन्फ्रास्ट्रक्चर हा 3.24 टक्क्याने निविदा भरली होती आज निविदा कमी दरामध्ये काम करायला तयार आहे म्हणजे अजुनही एखादी कंपनी येवु शकते. जी आपल्या दृष्टीकोनातुन परिपुर्ण असेल, सक्षम असेल आणि ती याच्या पेक्षा कमी दराने काम करू शकते तर शेवटी ही संधी आहे आणि कोणीही ही संधी कधी कोणी नाव कमविण्यासाठी करतो कधी कोणी शॉर्ट मार्जीन साठी करतो तर या सगळया गोष्ठींचा कुठेतरी विचार व्हायला पाहीजे आणि ही योजना आपल्या सगळयांचा हेतु चांगला असल्यानंतर  ही पारदर्शी पध्दतीने राबवली गेली पाहीजे अशी माझी या सभागृहाला विनंती आहे .

मुख्यलेखा परिक्षक,श्री.संतोष वाहुळे :- सन्मा.सभागृह ज्या विषयावर या सभागृहामध्ये चर्चा सुरू आहे मा.आयुक्त साहेबांनी आपल्या लक्षात आणुन दिले त्याबाबत काही बाबी मी आपल्या लक्षात आणुन देवु ईच्छितो, कुठलीही निविदा प्रक्रिया पार पाडल्यानंतर त्या निविदेमधे जे काही निविदाकार सहभागी असतात त्यामधुन सिस्टिमदवारे निश्चित केलेल्यानुसार एल-1 किंवा एल -2 चे दर प्राप्त होतात त्या प्राप्त निविदा दरा प्रमाणे आपण टेंडर ऍक्सेप्ट लेटर त्या निविदादाराला आपण देणे हे अपेक्षित असते. टेंडर एक्सेप्ट लेटर दिल्यानंतर त्यामध्ये आपण बाकीच्या मागणी जी करतो, करारनामाच्या ज्या अटी शर्ती आहेत त्यानुसार मक्तेदाराने स्टॅम्प डयुटीचा भरणा करावा. परफॉर्मन्स, बँक गॅरंटी घेतांना जी काही असेल ती ईत्यादी आपण मागणी करतो. आणि ती मागणी पुर्ण झाल्यानंतर आपण रितसर त्यांना कॉल करतो ही पध्दत आपल्याला सिस्टिम ने दिलेली पध्दत आहे. आपण त्यांना कायदेशीर रित्या मान्य केलेले नाही त्यामुळे त्यांनी जरी परफॉर्मन्स बँक गॅरंटी दिलेली असेल तरी ती स्विकाहार्य आहे असे मी म्हणणार नाही. दुसरी बाब अशी की सरांनी सांगीतल्या प्रमाणे प्रचंड कालावधी झालेला आहे, तो कालावधी पाहाता जे विधी सल्लागारांनी जो सल्ला दिलेला होता की प्रशासनाने जी कामे योजली आहेत प्रशासनाने खबरदारी घेण्यासाठी त्यासाठी स्थायी समितीचे पाठबळ असणे आवश्यक आहेत नियम 73(क) नुसार त्यामुळे आज जर आपल्याला हा निर्णय घेणे अपेक्षित असेल तर तो सर्व सभागृहाच्या संमतीने तो घेवुन आपण तो राज्य शासनाकडे पाठविणार आणि ते गरजेचे राहील दुसरा मुददा सन्मा.सदस्य श्री.लढढा यांनी विचारल्यानुसार एल-2 ला देता येईल कां ? एल-2 ला देण्याबाबतीत कुठेलेही शासन निर्देश किंवा शासन निर्णय नाही. मात्र जर हा कालावधी अधिक वाढवायचा असेल व आर्थिक भार भविष्यात यायचा असेल आणि जर तो टाळायचा असेल तर मनपाने जाणीपुर्वक घेतलेला हा निर्णय आणि तो निर्णय अंमलात तेव्हाच होईल जेव्हा राज्य शासन याला मान्यता देईल. त्यामुळे स्थायी समिती आणि प्रशासनाने एकत्रित पणे येवुन सांगोपांगपणे विचार करावा अशी सभागृहाला विनंती आहे. आणि त्यानंतर हा विषय मार्गी लावावा.

श्री.नितीन लढढा :- असा शासन निर्णयकुठेच नाही, माझा तोच मुददा आहे.

श्री.सदाशिव ढेकळे :- जसे आयुक्त साहेब यांनी सांगीतले एल-2 ला देण्या संदर्भामध्ये मी सहमत आहे. तसे आपणही दिले पाहीजे की, सहमत आहे की नाही ? ए-2 ला देण्या संदर्भात.

म.आयुक्त :- मला मा.सभापती महोदय, सभागृहाला विनंती करायची आहे. कुठेतरी हा विषय येथे होतो आहे, जेंव्हा आयुक्तांनी एकदा सांगीतले तर आर्थिक बाबतीत त्यांचे काही मत असेल तर ते ओव्हररूल करण्याचा अधिकार आयुक्तांना आहेत आणि स्थायी समिती ला आहेत तेव्हा आयुक्तांनी निवेदन दिल्यानंतर तुम्ही ऑडीटर ला विचारणे हे मला संयुक्तीक व बरोबर वाटत नाही.

श्री.सदाशिव ढेकळे :-  आपण सांगीतले यांचे मत वेगळे असु शकते म्हणुन मी बोललो.

म.आयुक्त :- असु शकते याचा अर्थ आयुक्तांनी बोलल्यानंतर कोणाच्याही मनामध्ये संभ्रम राहू नये म्हणुन मी त्यांना बोललो की सर बोला.

श्री.सदाशिव ढेकळे :- मग आपण असे बोलायला नको होते बोलायची आवश्यकता नव्हती असे मला वाटते .

मा.आयुक्त :- जर असे असेल तर सभागृहाला असे वाटत असेल तर आयुक्त मतच देणार नाही किंवा कुठलेही निवेदन देणार नाही.

श्री.सदाशिव ढेकळे :- हे जे काम आहे हे एल-2 ला देण्यासंदर्भात प्रशासनाने जो प्रस्ताव दिलेला आहे त्यास मी सहमत आहे आणि मी प्रशासनाने दिलेला प्रस्ताव मान्य करतो.

श्री.नितीन लढ्ढा :- या संदर्भात आमच्या ३ ही सदस्यांचे यास विरोध आहे तसेच माझी या विषया बाबत लेखी सूचना असून ती मी मा.सभापती महोदयाकडे देतो, आणि या संदर्भात कोणतेही न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास भविष्यात या योजनेचा जो काही आर्थिक भार या महानगरपालिकेवर पडेल त्याची सर्वस्वी जबाबदारी या संदर्भात निर्णय घेणाऱ्यांची राहील अशी माझी सुचना आहे तशी त्याची इतिवृत्तामध्ये नोंद घेणेत यावी. या योजनेला जो काही विलंब होईल तो विलंब  ज्यामध्ये निविदा राबविण्याच्या दृष्टाकोनातुन जो काही 2 ते 4 महिन्यांचा कालावधी लागतो त्याच्या व्यतिरीक्त जास्त कालावधी लागेल या न्यायालयीन प्रक्रीयेमध्ये त्याला

सुध्दा सर्वस्वी जबाबदार निर्णय घेणारे सदस्य असतील अशी माझी सुचना आहे माझी लेखी सुचना मी आपल्याला देत आहे आम्ही तिघेही सदस्यांचा या गोष्टीला विरोध आहे.

नगरसचिव :- एम.आय.एम.

श्री. बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम :- विरोध आहे.

*** सन्मा.सदस्या श्री.नितीन लढ्ढा यांनी दिलेली लेखी सूचना खालील प्रमाणे..,**

मा.सभापती महोदय,

स्थायी समिती,म.न.पा.जळगांव,

वरील विषया नुसार आज रोजी बोलिविलेल्या मिटींग मध्ये खालील मुद्यांची नोंद घेऊन इतिवृत्तामध्ये त्याची नोंद घ्यावी ही विनंती. सर्व विचाराअंती मी असे सुचवित आहे की, आदर्श निविदा प्रक्रियेचा विचार करिता सर्व निविदा रद् करुन, योत्य त्या अटी शर्तीचा समावेश करुन फेर निविदा मागविणे हे योजनेच्या दृष्टीने तसेच मनपा, मजीप्रा, स्थायी समिती सदस्य या सर्वांच्या दृष्टीने योग्य राहील.

सोबत माझे निरीक्षण व मुद्दे जोडीत आहे. त्याची नोंद घ्यावी.

पार्शभूमी :,

अमृत पाणी पुरवठा योजना दि.२५/०९/२०१६ रोजी प्रसिध्द झाली होती. दि.४/११/२०१६ रोजी लिफाफा क्र.१ उघडण्यात आला होता. चुकीच्या पध्दतीने म.जी.प्र.यांनी संतोष इन्फ्रास्ट्रक्चर यांना पात्र घोषित केल्याने सदर प्रकरण उच्च न्यायालयात गेल्यानंतर दि.६/१०/२०१७ रोजी म.जी.प्र. यांनी घेतलेला चुकीचा निर्णय व राज्य शासनाने दिलेली मान्यता रद्द केली. परंतु या सर्व चुकीच्या निर्णयामुळे ११/२०१६ मध्ये अंतिम होणारी निविदा प्रक्रिया तब्बल ११ महिने न्यायालयीन लढाई मुळे विलंब झाला.

आज स्थायी समिती समोर झालेलया प्रस्तावावर विचार करता मनपा पॅनल वरील असलेले विधी सल्लागार यांचे अभिप्राय पाहता मक्तेदार क्रिशान इन्फ्रास्ट्रक्चर यांचे बाबत तांत्रीक बाबींच्या अनुषंगाने गंभीर असे आक्षेप नोंदण्याचे दिसून येत आहे. परंतु या योजनेची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून म.जी.प्र.यांची नियुक्ती केलेली आहे. त्यांची जबाबदारी म्हणून निविदा अटी तयार करणे, निविदा संच तयार करणे, आलेल्या निविदाची प्रथम तांत्रिक छाननी करणे, त्या नंतर तांत्रिक बाबी परिपूर्ण असल्याची खात्री झाल्या नंतरच आर्थिक लिफाफा उघडण्या संदर्भात म.न.पा.स सूचीत करणे ही सर्व जबाबदारी म.जी.प्र.यांची असून या कामासाठीच त्यांना ३% फी दिली जाते. ती रक्कम साधारणत: ५ कोटीची रक्कम फी पोटी दिली जाणार असून एम.जी.पी.ने आपले कर्तव्य पार पाडतांना ज्या पध्दतीने अत्यंत बेजबाबदार पध्दतीने जबाबदारीचे कोणतेही भान न ठेवता क्रिशना इन्फ्रास्ट्रक्चर या मक्तेदारास पात्र ठरविण्याची चूक करुन या संपूर्ण प्रक्रियेत मोठया प्रमाणावर कायदेशीर गुंता निर्माण करुन ठेवलेला आहे असे दिसून येते.

भूमिगत गटार योजनेच्या निविदा प्रक्रिये बाबत आज रोजी बोलविलेल्या स्थायी सिमतीच्या मिटींग बद्दल खालील प्रमाणे माझे निरीक्षण व मुद्दे आहेत,

१) L1 मक्तेदारास नाकारुन L2 मक्तेदारास, (म.जी.प्रा.यानाही डावलुन) काम देण्यासंदर्भात स्थायी समितीला अधिकार आहेत का ? माझे मते हा अधिकार स्थायी समितीस अमृत योजनेत नाही.

२) निविदेतील कोणत्या अटीशर्ती प्रमाणे L1 ला रद्द करुन L2 ला काम देण्याची तरतूद आहे ? व L2 लाच दयायचे असल्यास ती संधी उर्वरित सर्व कॉट्रॅक्टर यांना पण उपलब्ध होणे गरजेचे आहे.

३) जर एल 1 हा स्वत: हे काम करण्यास असमर्थ असल्याचे कळविले जसे की अक्रिमेंट न करणे, बँक गॅरंट न देणे किंवा काम सुरु करण्यास असमर्थता दाखविने त्या वेळी त्याची इमेडी जमा करुन एल 2 ला बोलविण्याची तरतूद निविदेत असते.

४) मक्तेदार क्रिशाना इन्फ्रास्ट्रक्चर यांनी दि.२२/०४/२०१९ रोजी १,६९,८६,९४१ या रक्कमेची बँक गॅरंटी म.न.पा.स दिली. त्यापूर्वी दि.१६/०४/२०१९ रोजी म.न.पा.ला श्री.अजितकुमार मांगलाणी यांनी तक्रारीने मक्तेदार हा ब्लॅक लिस्टेड आहे हे कळविलेले असतानाही म.न.पाने दि.२२/०४/२०१९ ला बँक गॅरंटी का स्वीकारली ? हा मुद्दा सुध्दा उपस्थित होऊ शकतो.

५) वरील सर्व बाबींचा विचार करिता असे सूचीत करु इच्छितो की ही सर्व निविदा प्रक्रिया रद्द करुन पुन्हा फेर निविदा काढणेच तांत्रीकदृष्टया व कायदेशीर दृष्टया योग्य निर्णय होईल. अन्यथा जर कुणी न्यायालयात गेले तर, एल-1 लाच काम मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही, जर न्यायालयाने तांत्रीक रित्या पात्र कॉन्ट्रॅक्टरला नाकारण्याचा अधिकार समितीस आहे कां ? असे विचारल्यास अडचण निर्माण होऊ शकेल. एल-1 बाबत कुठलाही निर्णस नसताना एल-2 शी वाटाघाटी कोणी केल्यात ? व आजच्या मिटींगमध्ये कां चर्चेस आणल्यात ? या सारखे त्रासदायक प्रश्नांना पुढे उत्तरे देणे अडचणीचे होऊ शकते.

तरी या संपुर्ण बाबींचा प्रशासनाने गांभीर्याने विचार करुन नव्याने निविदा प्रक्रीया राबविणे कायदेशीर संयुक्तीक आहे. या संदर्भात जर कोणी न्यायालयात गेल्यास व योजनेस विलंब होवून झालेल्या नुकसानीस प्रस्ताव मान्य करणारे सदस्य व अधिकारी जबाबदार राहतील याची नोंद घेवुन कार्यवाही करावी व आम्ही सहया करणारे नगरसेवक हयांनी या प्रस्तावास आमचा सभागृहात विरोध नोंदवावा.

सदर पत्रावर सन्मा.सदस्य श्री.नितीन बालमुकूंद लढ्ढा, श्री.नितीन मनोहर बरडे, श्री.विष्णू रामदास भंगाळे व एम.आय.एम.चे सन्मा.सदस्य श्री. बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम यांनी स्वाक्षरी केलेली आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १२१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, अमृत अभियाना अंतर्गत जळगाव शहर मलःनिसारण योजनेच्या टप्पा u 1 मधील कामाची ई - निवीदा क्र. 1281 / 2019 दिनांक 19.02.2019 रोजी राष्ट्रीय स्तरावर दैनिक हिंदुस्तान टाईम्स इंग्रजी भाषेतून, दिनांक 19.02.2019 राज्य व स्थानिक स्तरावर दैनिक लोकमत मराठी भाषेतून प्रसिद्ध करण्यात आलेली होती. सदर कामापैकी स्थापत्य कामांची निविदा रक्कम रू.169,86,94,030/- आहे. सदर निविदा सादर करणेची मुदत दिनांक 14.03.2019 पावेतो होती. यापुर्वी सदर निविदेकामी 13 वेळा मुदतवाढ व प्रसिध्दीची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

संदर्भिय शासन परीपत्रक क्रं.01 अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मार्फत अभियान शहरांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या निविदा प्रपत्रांनुसार निविदा प्रक्रिया पुर्ण करणे सर्व अभियान शहरांना बंधनकारक करण्यात आलेले आहे. तसेच प्राप्त होणाऱ्या निविदांची तपासणी करण्याची जवाबदारी ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची असल्याचे निर्देश आहेत.

निविदेचा लिफाफा क्रं.01 दिनांक 18.03.2019 रोजी उघडण्यात आलेला असुन त्यातील कागदपत्रे पडताळणीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे विभाग कार्यालयास तातडीने पुरविण्यात आलेली होती. सदर कामी एकुण 04 निविदाकारांनी निविदा सादर केलेल्या आहेत.

1) जैन इरीगेशन सि.लि. जळगाव
2) ड्रीम कन्स्ट्रक्शन लि. मुंबई.
3) कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनी, अहमदाबाद.
4) एल सी ईन्फ्रा प्रोजेक्टस प्रा लि अहमदाबाद.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कडील दिनांक 02.04.2019 च्या पत्राअन्वये उपरोक्त 04 निविदा धारक तांत्रिक पडताळणीत पात्र ठरत असल्याने आर्थिक देकाराचा लिफाफा क्रं.02 उघडण्याबाबत कळविले होते. त्यानुसार सर्व मक्तेदारांना कळवून दिनांक 16.04.2019 रोजी लिफाफा क्रं.02 निविदा समिती समक्ष, मजीप्रा चे उपविभागिय अभियंता व मक्तेदार यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. यात खालील प्रमाणे दर प्राप्त झाले.

| अ.नं. | कंपनीचे नाव | प्राप्त दर |
|---|---|---|
| 1 | कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनी, अहमदाबाद. | अंदाजित दरावर 6.25 % कमी |
| 2 | एल सी ईन्फ्रा प्रोजेक्टस प्रा लि अहमदाबाद. | अंदाजित दरावर 3.24 % कमी |
| 3 | ड्रीम कन्स्ट्रक्शन लि. मुंबई | अंदाजित दरावर 0.50 % जास्त |
| 4 | जैन इरीगेशन सि.लि. जळगाव | अंदाजित दरावर 6.90 % जास्त |

दिनांक 16.04.2019 रोजी लिफाफा क्रं.02 मध्ये प्राप्त दरांचा अहवाल कार्यकारी अभियंता, मजीप्रा विभाग जळगाव यांना पाठविण्यात आलेला होता. त्यानुसार सर्वात कमी दर भरलेले मक्तेदार कृष्णा कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद यांनी दिनांक 22.04.2019 रोजी रू.1,69,86,941/- रकमेची Performance bank Guarantee मनपास सादर केलेली आहे. मक्तेदार कृष्णा कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद यांचे बाबत दिनांक 16.04.2019 रोजी तक्रारदार श्री.अजितकुमार मांगलाणी यांनी गुजरात राज्याच्या महामंडळाने कृष्णा कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद यांना काळया यादीत टाकलेले असल्याने अपात्र करावे अशी तक्रार केली होती. तसेच दिनांक 24.04.2019 रोजी श्री. रविंद्र बळीराम पाटील यांनी तक्रार केलेली असुन यात कृष्णा कन्स्ट्रक्शन यांनी निविदेत रू.500/- प्रतिज्ञापत्रावर काळया यादीत नाव नसल्याचे लिहून दिले असून प्रत्यक्षात सदर मक्तेदार यांना सरदार सरोवर नर्मदा निगम लि गुजरात यांचेकडून काळया यादीत टाकणेसाठी debar करण्यात आले असुन निविदा सादर करतांना दिलेली प्रमाणपत्रे सत्यप्रतिज्ञेवर दिली नसल्याची तक्रार केली आहे.

उपरोक्त तक्रारींची शहानिशा करण्यासाठी कार्यकारी अभियंता मजीप्रा विभाग जळगाव यांना दि.03.05.2019 रोजी कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर कामी मे. कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनी अहमदाबाद यांचे कडून दिनांक 03.05.2019 च्या पत्रानुसार खुलासा मागविण्यात आलेला होता. मक्तेदाराकडून दिनांक 08.05.2019 रोजी प्राप्त खुलास्याची प्रत देखील मजीप्रा विभागास पुढील पडताळणी साठी दिनांक 09.05.2019 रोजी पाठविण्यात आलेली होती. मक्तेदार यांनी दिलेल्या खुलास्यानुसार मे. उच्च न्यायालय गुजरात अहमदाबाद बेंच यांनी दिनांक 06.03.2019 रोजी निर्णय दिला असुन त्यांनी सरदार सरोवर नर्मदा निगम लि गुजरात यांनी केलेल्या Debar व Stop payment च्या कारवाईस

स्थगिती दिलेली आहे. मजीप्रा विभागाने दिनांक 11.06.2019 रोजी मजीप्राचे विधी सल्लागार यांचा सल्ला घेतलेला असुन कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनी अहमदाबाद यांचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे व दिनांक 06.03.2019 रोजीचे गुजरात उच्च न्यायालयाचे आदेशाने त्यांचे नाव काळया यादीत समाविष्ट करण्याच्या कारवाईस पुढील आदेश होईपावेतो स्थगिती दिली आहे त्यामुळे कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनी अहमदाबाद यांना निविदेसाठी पात्र ठरविले ते योग्य आहे असे कळविले आहे.

मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी संदर्भिय पत्र क्र.6 नुसार मे. कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनी अहमदाबाद यांचेअंदाजित दरावर 6.25 % कमी दराच्या निविदा दराला मान्यता देण्याबाबत प्रस्ताव महानगरपालिकेस सादर केलेला आहे. तथापि,

1. सदर कामी मक्तेदाराच्या विरूध्द मे. न्यायालयात प्रलंबीत असलेल्या दाव्याच्या अनुषंगाने महानगरपालिका विधी सल्लागार यांचे अभिप्रायासाठी प्रस्ताव पाठविणेत आलेला होता. महानगरपालिका विधी सल्लागार यांचे दिनांक 21.06.2019 रोजी मार्गदर्शन प्राप्त झाले असुन यात " लिफाफा क्रं.01 मध्ये अनुसुची-6 मध्ये मक्तेदाराच्या वतीने दिनांक 13.03.2019 रोजी हमीपत्र निविदेत भरण्यात आले असुन यात कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनी अहमदाबाद यांना कोणत्याही शासकीय / निमशासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेने काळया यादीत समाविष्ट केले नसल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे त्यांना पुढील कार्यवाहीस पात्र ठरविण्यात आले होते. तथापि तदनंतर त्यांचे बाबत प्राप्त तक्रारींनुसार खुलासा मागविण्यात आल्यानंतर सरदार सरोवर नर्मदा निगम लि गुजरात यांनी दि.22.02.2019 ला सुरू केलेल्या डिबार च्या कारवाईस मे.उच्च न्यायालयाचे आदेशाने दिनांक 06.03.2019 रोजी तात्पुरते निलंबित केले आहे व तो आदेश वेळोवेळी कायम ठेवला आहे. त्यामुळे कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनी अहमदाबाद यांनी महानगरपालिकेकडे निविदा भरतांना सत्यपरीस्थिती लपवून कागदपत्रे सादर केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. मे. उच्च न्यायालयात दाखल प्रकरणातील विषय व त्यात वेळोवेळी होत असलेले आदेश पाहता, सदर प्रकरण गंभीर स्वरूपाचे आरोप असलेले आहे. कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनी अहमदाबाद यांनी निविदा दाखल करतांना खरी बाब महानगरपालिकेपासून लपवून ठेवलेली असल्याने प्रशासनाने त्याबाबत योग्य ती खबरदारी घेणे गरजेचे व महत्वाचे आहे " असे नमूद केलेले आहे.

2. कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनी अहमदाबाद यांनी निविदेत नमूद केल्यानुसार दिनांक 14.03.2019 रोजी प्रतिज्ञालेख सादर केला असुन यात आमची कंपनी गेल्या 7 वर्षात कुठल्याही लवादकाच्या दाव्यात / मे न्यायालयाच्या दाव्यात सामील नसल्याचे लिहून दिले आहे, प्रत्यक्षात दिनांक 22.02.2019 पत्रानुसार झालेली DEBAR ची कारवाई, मे.न्यायालयात दाखल याचिका, दिनांक 06.03.2019 च्या दाव्यात झालेला स्थगितीचा आदेश ही माहीती मक्तेदार यांनी निविदा सादर करतांना महानगरपालिकेच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक होते. सदर माहीतीचा घटनाक्रम मक्तेदार यांनी निविदा भरतांना दिलेला नाही असे दिसून येते. सदर कृती निविदा तरतूदींचे उल्लंघन करणारी आहे. मक्तेदार यांचे कडून महानगरपालिकेने खुलासा मागविला असता, मक्तेदार यांनी दिनांक 08.05.2019 च्या पत्राअन्वये त्यांचेवर सरदार सरोवर नर्मदा निगम लि गुजरात यांनी केलेल्या कारवाई विरूध्द दाखल केलेल्या याचिकेत मे.न्यायालयाने दिनांक 06.03.2019 रोजी (निविदा सादर करण्याआधी) स्थगिती दिली असल्याचे नमूद करून त्यांचेवर यापूर्वी झालेल्या कारवाई बाबत व सुरू असलेल्या दाव्याबाबत कबुली दिली आहे.

मे.न्यायालयाने या प्रकरणी अंतिम आदेश दिलेले नसून प्रकरण अदयापही न्याय प्रविष्ट आहे. त्यामुळे यात अंतिम निकाल होण्यासाठी लागणाऱ्या कालावधीची शाश्वती देता येणार नाही. निविदा मागवितांना घेण्यात येत असलेली प्रमाणपत्रे, प्रतिज्ञालेख हे अश्या स्वरूपाच्या प्रकरणांत प्रलंबित असलेल्या कारवाईमुळे निविदा अंतिम करण्यास विलंब होवू नये या उददेशाने घेण्यात येतात.

व्दितीय क्रमांकावर पात्र असलेले मक्तेदार एल सी ईन्फ्रा प्रोजेक्टस प्रा लि अहमदाबाद यांनी दिनांक 22.06.2019 रोजी पत्र दिले असून या कामाच्या निविदेत सर्वात कमी दर 6.25 % प्राप्त झाले असुन जर महानगरपालिका भविष्यात सदर काम व्दितीय क्रमांकाच्या मक्तेदारास देण्यास ईच्छुक असल्यास निविदा रकमेवर 6.25 % कमी दराने काम करण्यास तयारी दर्शविली आहे. त्यामुळे या कामासाठी कुठलाही जादा खर्च येणार नाही व विहीत कालावधीत काम पुर्ण होईल.

सदर कामी सर्वात कमी दर असलेले मक्तेदार कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनी अहमदाबाद यांना दि.२२/०२/२०१९ रोजी डिबार करणेची कार्यवाही झालेली असतांना दि.१३/०३/२०१९ रोजी निविदा सादर करतांना विस्तृत निविदा सुचनेतील सुचना क्रं.१५ (फ) नुसार स्वत:हुन घोषित करावयाचे प्रतिज्ञापत्रात (अनुसुची - ६) मध्ये शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेने काळया यादीत नाव समाविष्ट केले नसल्याबाबत लिहून दिले आहे. तसेच विस्तृत निविदा सुचनेतील १५ (अ) नुसार " निविदा पूर्व अर्हता" मधील बाबींच्या सत्यतेच्या पृष्टयर्थ प्रमाणपत्र दिले असून यात सदर कंपनीवर न्यायालयात दावा सुरु असतांना कुठलाही दावा सुरु नसल्याचे प्रमाणपत्र दि.१३/०३/२०१९ रोजी निविदेत दिले आहे. निविदा पुर्व बैठकीचे दि.०६/०३/२०१९ मध्ये रुपये ५०० च्या मुद्रांक

पेपरवर प्रतिज्ञापत्रात चुकीची माहिती सादर केल्यास कारवाईस जबाबदार राहील असे प्रतिज्ञापत्र मक्तेदाराने दिले आहे. त्यामुळे निविदा नियमांचे उल्लंघन झाले असून या बाबींचा विचार करता निविदेतील पृष्ठ क्रं.16 वरील क्रं.18 च्या राखुन ठेवलेल्या अधिकारानुसार कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनी अहमदाबाद याची निविदा नाकारून व्दितीय पात्र मक्तेदार एल सी ईन्फ्रा प्रोजेक्टस प्रा लि अहमदाबाद यांचे कडून निविदा रकमेवर 6.25% कमी दराने काम करून घेणे कामी येणारा खर्च रू.159,25,25,654/- ला व संविदा करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 73 क नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकुल मते :- १२ प्रतिकुल मते :- ०४**

**सुचक :- श्री.सदाशिव गणपतराव ढेकळे**

**अनुमोदक :- श्री.मयुर चंद्रकांत कापसे**

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सभागृहाला विनंती करतो की, राष्ट्रगीतासाठी सर्वांनी उभे राहावे.

राष्ट्रगीता नंतर येणे प्रमाणे सभेचे कामकाज संपन्न झाले.

सही/-

**सभापती**

**स्थायी समिती**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**